दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ४ थे अंक ५१ वा बुधवार दि.२४ जूलै २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## लातूर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघात काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे उमेदवार विजय व्हावेत, या दृष्टीने सूक्ष्म नियोजन करावे - माजी मंत्री आमदार अमित देशमुख

### लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीची आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा बैठक संपन्न

लातुर प्रतिनिधी : दि. २३ जूलै २०२४ लातूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाला मिळालेले यश हे सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या परिश्रमाचे फळ आहे. या निवडणुकीत आलेले अनुभव लक्षात घेऊन लातूर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघात काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे उमेदवार विजय व्हावेत या दृष्टीने सूक्ष्म नियोजन करावे असे आवाहन, माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाच्या पाश्वभुमीवर लातूर शहरातील काँग्रेस भवन येथे लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवार दि. २३ जुलै रोजी सकाळी व्यापक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत लोकसभा निवडणुकीतील एकूण कामकाजाचा आढावा घेण्यात येऊन प्रातिनिधिक स्वरूपात काही जणांचे अभिनंदन करून सत्कारही करण्यात आला. यावेळी आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पुर्वतयारीच्या अनुषंगाने नियोजन व चर्चा करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा काँग्रेसचे प्रभारी माजी आमदार रामहरी रुपनवर हे होते. यावेळी लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे प्रभारी डॉ. जितेंद्र देहाडे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, सरचिटणीस मोइज शेख, सरचिटणीस अमर खानापुरे, सचिव अभय साळुंके, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा.चेअरमन तथा काँग्रेसचे औसा विधानसभा निरीक्षक समद पटेल, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, सरचिटणीस मोइज शेख, सरचिटणीस अमर खानापुरे, सचिव अभय साळुंके, लातूर जिल्हा काँग्रेस डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ अरविंद भातांबरे महेश देशमुख आदीसह प्रदेश काँग्रेसचे पदाधिकारी, फ्रंटलचे पदाधिकारी, सर्व तालुका अध्यक्ष सर्व शहराध्यक्ष सर्व काँग्रेसचे प्रभाग अध्यक्ष विविध पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीतील अनुभवाचा आगामी विधानसभा निवडणूकीसाठी उपयोग व्हावा या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी यावेळी बोलतांना पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिल्या. विधानसभा मतदारसंघनिहाय सर्व बुथवरीलवरील, कामाचा अभ्यास करावा, जिथे आपण कमी पडलो तेथील कारणांचा शोध घेऊन तेथे ताबडतोब दुरुस्त्या कराव्यात असेही त्यांनी यावेळी सांगितले, लातूर जिल्हयातील ऊदगीर, अहमदपूर हे विधानसभा मतदारसंघ काँग्रेस पक्षासाठी सोडून घ्यावेत असे तेथील पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मागणी केली आहे या संदर्भात पक्षश्रेठी योग्य तो निर्णय घेतील जिल्हयातील सहाही विधानसभा मतदारसंघात काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी होतील या दददददददददददददददददददददददददददददददददददददददददददङई सर्वांनी आजपासूनच तयारीला लागावे असे आवाहन माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी केले. लोकसभेची लढाई जिंकली आता विधानसभेची जिंकूया रामहरी रुपनवर लातूर जिल्हा काँग्रेसचे प्रभारी माजी आमदार रामहरी रुपनवर म्हणाले की, लातूरचा काँग्रेसचा खासदार जिंकला आहे त्यामुळे आपण एक लढाई जिंकलो आहोत दुसरी विधानसभा लढाई जिंकणे आता बाकी आहे. लोकसभेला वेळापत्रक ठरवून आपण सामोरे गेलो, त्याप्रमाणे विधानसभेलाही आपण सर्वजण मिळून काम करू आणि जिंकू त्यासाठी काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे ते म्हणाले. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्वांनी आतापासून कामाला लागावे आमदार धीरज विलासराव देशमुख लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख म्हणाले की, काँग्रेसचे नेते मा. श्री. राहूलजी गांधी यांनी काढलेल्या भारत जोडो आणि न्याय यात्रेतून काँग्रेस व इंडिया आघाडीचा जाहीरनामा पुढे आला. तो वचननामा घेऊन आपण जनतेपर्यंत घेऊन गेलो, त्यामुळे काँग्रेस व मित्रपक्षांना लोकसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळाले. लोकसभा निवडणुकीतील यशामुळे आपला आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्वांनी आतापासून कामाला लागावे असे आवाहन यावेळी त्यांनी केले. या बैठकीचे प्रास्ताविक डॉ. जितेंद्र देहाडे यांनी केले, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन लातूर लातूर जिल्हा काँग्रेस सोशल मीडियाचे अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी यांनी केले. प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व मान्यवरांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेस भवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यांनतर बैठकीच्या सुरुवातीला लातूर लोकसभा मतदारसंघासघतील काँग्रेसचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या विजयासाठी अहोरात्र मेहनत करून उल्लेखनीय कामगिरी केलेल्या काँग्रेसच्या सर्व विधानसभा निरीक्षकांचा माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व मान्यवरांच्या हस्ते सत्कार सत्कार करण्यात आला. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते यावेळी डॉ. वैभव हासबे यांना काँग्रेस शिरूर अनंतपाळ डॉक्टर सेलच्या शहराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नियुक्तीपत्र देण्यात आले. तसेच लातूर जिल्हा युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी प्रवीण बिरादार यांची नुकतीच निवड झाली आहे. आज लातूर काँग्रेस भवन येथे झालेल्या पक्षाच्या व्यापक बैठकीदरम्यान त्यांचा सत्कार करून आगामी कामकाजासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. या बैठकीस जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा काँग्रेसचे निलंगा विधानसभेचे निरीक्षक संतोष देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन तथा लोहा कंधार विधानसभेचे निरीक्षक विजय देशमुख, लातूर ग्रामीण विधानसभेचे काँग्रेसचे निरीक्षक अनुप शेळके, काँग्रेसचे उदगीर विधानसभेचे निरीक्षक रवींद्र काळे, लातूर शहर विधानसभेचे काँग्रेसचे निरीक्षक ड. दिपक सूळ, महाविकास आघाडी लातूरचे समन्वयक सचिन बंडापले, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, माजी उपनगराध्यक्ष मोहन माने, लातूर शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष इमरान सय्यद, लातूर जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा शीलाताई पाटील, लातूर शहर जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा प्रा. डॉ.स्मिता खानापुरे आदी उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शिरूर आनंतपाल तालुक्यातील शेकडो कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शिरूर आनंतपाल तालुक्यातील परमेश्वर जळकोटे, आदित्य लांडगे, विशाल गिलचे, बाळू घोलप, महादू डोंगरे आदी शेकडो कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व मान्यवरांनी त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.






## सर्वकष विकासाचा लोककल्याणकारी अर्थसंकल्प माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर



लातूर/प्रतिनिधी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील तिसजया केंद्र सरकारमध्ये कार्यरत असलेल्या अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी मांडलेला अर्थसंकल्प देशवासियांची मने जिंकणारा आहे. देशातील प्रत्येक समाज घटकांचा विचार करत त्यांच्या आशा आंकांक्षाची पुर्तता करण्याचा संकल्प यानिमित्ताने मांडण्यात आल्याच्या प्रतिक्रिया माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली आहे. शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, सहकार, रोजगार, स्वयंरोजगार, विज्ञान, संशोधन, कौशल्य विकास, सामाजिक ज्ञान व महिला सक्षमीकरण या सर्व क्षेत्रांच्या विकासाला बळ देत विकसित भारताची पायाभरणी करणारा हा अर्थसंकल्प देशाला विश्वशक्ती बनविण्यासाठी अतिशय महत्वाचा ठरणार आहे. शहरी व ग्रामीण विकासाचा समतोल साधत रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यासाठी महत्वाची तरतूद या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील दळणवळण सुविधा अधिक सुलभ करण्यासाठी पंतप्रधान ग्रामसडक योजनेचा चौथा टप्पा सुरू करण्याचा निर्णय अतिशय महत्वाचा आहे. त्याच बरोबर एक कोटी शेतकजयांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन देण्याचा निर्णयही महाष्ट्रातील शेतकजयांसाठी महत्वाचा आहे. कररचनेत बदल करून सर्वसामान्यांना दिलासा देत रुग्णांनाही अधिक सुविधा देण्यसाठी करण्यात आलेली तरतूद ही निश्चितच प्रत्येक भारतीयांसाठी महत्वाची ठरणार आहे. त्यामुळेच हा अर्थसंकल्प म्हणजे सर्वकष विकासाचा लोककल्याणकारी अर्थसंकल्प असल्याचे माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले आहे.

## अर्थसंकल्प महाराष्ट्रासाठी अत्यंत निराशाजनक - धिरज विलासराव देशमुख (आमदार, लातूर ग्रामीण)



सादर झालेला केंद्रीय अर्थसंकल्प महाराष्ट्राची घोर निराशा करणारा आहे. बिहार आणि आंध्रप्रदेशला केंद्र सरकारने झुकते माप दिले आहे. पण, महाराष्ट्र देशातील एक महत्त्वाचे राज्य असूनही कुठलीही महत्त्वाची तरतूद केंद्राने महाराष्ट्रासाठी केली नाही. वाढती महागाई, वाढती बेरोजगारी, वाढत्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, उद्योगांची पळवापळवी... असे अनेक प्रश्न महाराष्ट्रासमोर उभे आहेत. पण, केंद्र सरकार सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून भारतीय जनता पक्षाला अपेक्षित मतदान मिळाले नाही. तरीही भाजपचे या महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष कायम आहे, हे अर्थसंकल्पातून अधोरेखित होत आहे. याआधी केंद्र सरकारने 'स्मार्ट सिटी'ची घोषणा केली होती. पण इतक्या वर्षांत खरंच स्मार्ट सिटी झाल्या का? जुन्या घोषणा पूर्ण न करता केंद्र सरकार आता 'मोठ्या शहरांचा कल्पकतेने विकास करू', 'शहरांना स्वच्छ पाणी पुरवू' अशा चमकदार घोषणा करीत आहे. जनता अशा घोषणांना बळी पडणार नाही. विधानसभा निवडणुकीत जनता योग्य ते उत्तर देईल, असा विश्वास वाटतो.

## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटी



लातुर / प्रतिनिधी : - राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज मंगळवार दि. २३ जुलै रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरीकांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन निवेदनाचा व निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दत्तात्रय बनसोडे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, लातूर जिल्हा काँग्रेस डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ. अरविंद भातांबरे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील पडिले, उद्योजक तुकाराम पाटील, बाबुराव जाधव, रामभाऊ बोरगावकर, प्रकाश देशमुख, दगडूसाहेब पडीले, डॉ.सतीश कानडे, तानाजी फुटाणे, बिबीशन शिंदे, जानूमीया शेख, किरण शिंदे, विकास वाघमारे, महेश देशमुख, हणमंत पवार, बालाजी कसबे, अण्णा भालेकर, शरद देशमुख, प्रवीण शिंदे, गोपाळ कांबळे, गणेश भालेकर, दत्ता हजारे, सचिन रणदिवे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## राज्य शासनाने बौद्ध अनुसूचित जातींचा प्रगतीचा निधी वळवण्याचे शासन निर्णय तात्काळ रद्द करावेत. एन. डी.एम.जे संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री यांना निवेदन




लातूर :- राज्य शासनाने बौद्ध अनुसूचित जातींचा प्रगतीचा निधी वळवण्याचे शासन निर्णय तात्काळ रद्द करावेत. नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस (एन. डी.एम.जे ) महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन महाराष्ट्र शासनाने बौद्ध अनुसूचित जातींचा प्रगतीचा निधी मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्यासाठी व मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना राबविण्यासाठी न वळविता सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा निधी अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांच्या प्रगती करिता व शिष्यवृत्तीसाठीच वापररुन, वारकऱ्यांच्या विकासासाठी वेगळा निधी उपलब्ध करून,जाती जातीत तेड निर्माण करण्याचे थांबवणे

नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस (एन. डी.एम.जे) महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या वतीने, राज्याचे महासचिव ॲड.केवलजी उके , राज्य सचिव वैभवजी गीते , यांच्या सूचनेनुसार निवेदन सादर करतोत की सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत बौद्ध, मातंग, चर्मकार, होलार, यांच्यासह अनुसूचित ५९ जातींच्या नागरिकांच्या प्रगतीसाठी खर्च करण्यात येणारा निधी, जाती जातीमध्ये तेढ निर्माण करण्यासाठी, राज्य सरकार हा निधी महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मीयांमधील साठ वर्षे व त्यावरील जेष्ठ नागरिकांना तीर्थ दर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.तसेच महाराष्ट्र राज्यातील कीर्तनकार व वारकऱ्यांना सोयीसुविधा पुरविण्याकरिता मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्याबाबतचा शासन निर्णय १४ जुलै २०२४ रोजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने जारी केलेला आहे. हे शासन निर्णय मा.मंत्री मंडळाच्या ११ जुलै २०२४ च्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात आला आहे. शिवाय वारकऱ्यांच्या प्रत्येक दिंडीसाठी प्रत्येकी ३० हजार रूपये देखील देण्यात येणार आहेत. सामाजिक न्याय व विशेष विभाग हा मागासवर्गीय बौद्ध, मातंग, चर्मकार,होलार,या समाजांसह अनुसूचित जातींच्या ५९ जातींच्या प्रगतीसाठी त्यांच्या उन्नतीसाठी असलेला विभाग आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा, वंचित घटकातील गोरगरिबांच्या प्रगतीचा उन्नतीचा निधी धार्मिक स्थळांच्या सहलीसाठी व वारकरी सांप्रदाय यांच्यासाठी महामंडळ स्थापन करण्यासाठी तसेच वारकऱ्यांच्या दिंडीसाठी देणे हे राज्य शासनाला शोभणार नाही. वंचित घटकांना अनुसूचित जातीच्या नागरिकांना दलितांची प्रगती उन्नती होऊ द्यायची नाही, त्यांच्यासाठी असणाऱ्या योजनांची अंमलबजावणी करायची नाही,सुधारित कोणतीही योजना आणायची नाही. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वेळेवर द्यायची नाही. उच्च शिक्षणात भेदभाव करायचा आणि उरला सुरला त्यांच्या प्रगतीचा असणारा निधी देखील इतर विभागांना धार्मिक स्थळे पाहण्यासाठी देऊन टाकायचा म्हणजे मागासवर्गीयांवरती हा दुहेरी अत्याचारच आहे. वंचित घटकातील अनुसूचित जाती प्रवर्गातील नागरिकांना व वारकऱ्यांना एकमेकांत झुंजवत ठेवून भांडणे लावण्याचाच प्रकार यातून दिसत आहे.आमचा विरोध हा वारकरी किंवा वारकरी महामंडळास नाही. वारकऱ्यांच्या अडी अडचणी सुटल्या पाहिजेत.वारकऱ्यांची प्रगती झालीच पाहिजे.परंतु शासनाच्या इतर विभागातून त्यांना निधी उपलब्ध करून दिला पाहिजे.अशी आमची मागणी आहे. राज्य शासनाने बौद्ध अनुसूचित जातींचा प्रगतीचा निधी वळवण्याचे शासन निर्णय तात्काळ रद्द करावेत. वारकरी महामंडळ यांचा व तीर्थ यात्रेचा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा दुरान्वये देखील संबंध नाही. सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्यास बौद्ध अनुसूचित जातींच्या नागरिकांच्या तीव्र रोशास सामोरे जावे लागेल याची कल्पना शासनास असल्याने, राज्य शासनाने निधी न वळवता वारकरी महामंडळ व तीर्थ दर्शन योजना सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत आणून सामाजिक न्याय विभागाचा निधी या योजनांकरिता खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. ही बाब अत्यंत चुकीची असून चीड आणणारी आहे. त्यामूळे महाराष्ट्र शासनाने बौद्ध अनुसूचित जातींचा प्रगतीचा निधी मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्यासाठी व मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना राबविण्यासाठी वापरू नये. अन्यथा महाराष्ट्र भर तीव्र आंदोलन छेडले जाईल.तसेच बौद्ध, मातंग, चर्मकार, होलार, या समाजासह अनुसूचित जातीतील ५९ जाती राज्य शासनाला सरकारला आगामी विधानसभेच्या निवडणुकांमध्ये त्यांची जागा दाखवल्याशिवाय शांत बसणार नाहीत. म्हणून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा निधी कोठेही वळवण्यात येऊ नये ही विनंती.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# बायडेन यांची माघार!

डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते आणि अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या आगामी निवडणुकीतून माघार घेतल्याने त्या देशातील निवडणूक समीकरणे पूर्णपणे बदलणार आहेत. १९६३ मध्ये जॉन केनेडी यांच्या हत्येनंतर लिंडन जॉन्सन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले; मात्र त्यांच्याच कारकिर्दीत व्हिएतनाम युद्ध होऊन, त्यात प्रचंड संख्येने अमेरिकन सैनिकांचा मृत्यू झाला. या युद्धात अमेरिकेस अपयशही आले. जॉन्सन यांची लोकप्रियता घसरणीस लागली, तरीही जॉन्सन पुन्हा एकदा राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी उभे राहू पाहत होते; परंतु न्यू हॅम्पायर येथील 'प्रायमरीज'मध्ये निराशाजनक निकाल आल्यानंतर त्यांनी उमेदवारी मागे घेतली. त्यानंतर उमेदवारी मागे घेण्याचा प्रकार आता बायडेन यांच्याबाबतच घडला आहे. अलीकडे रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबर झालेल्या अध्यक्षीय उमेदवारांमधील जाहीर वादविवादात बायडेन सपशेल पराभूत झाले. तसेच माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा, संसदेच्या माजी सभाध्यक्ष नॅन्सी पलोसी प्रभृतींनी बायडेन यांनी निवडणुकीच्या रिंगणातून बाजूला व्हावे, अशी मागणी केली होती. बायडेन यांनी माघार घेताना हॅरिस यांचे नाव पुढे केले आहे, हे विशेष. अलीकडील काळात बायडेन यांच्या अनेक शिखर परिषदांमधील व अन्य कार्यक्रमांमधील भाषणांत वारंवार चुका होऊ लागल्या होत्या. त्यांना काही व्यक्तींची नावे वा तपशील पटकन आठवत नव्हता. विमानाच्या शिड्या चढताना, तसेच सार्वजनिक समारंभांमध्ये ते बरेचदा धडपडून पडलेही. त्यामुळे शारीरिकदृष्ट्या ते कितपत फिट आहेत, असा प्रश्न विचारला जात होता. बायडेन हेच राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार असल्यास, त्यांचा तर पराभव होईलच, परंतु डेमॉक्रॅटिक पक्षाचीही हानी होईल, असे मत पक्षातूनच व्यक्त केले जात होते. ट्रम्प यांची आक्रमकता, बेधडकपणा, नाट्यात्मकता आणि छाप पाडणारे वक्तृत्व यांच्या तुलनेत बायडेन फिके पडणार, हे दिसतच होते. त्यातच नुकताच ट्रम्प यांच्यावर हल्ला झाल्याने त्यांच्या बाजूने सहानुभूतीची लाट निर्माण झाली आहे. मिशिगनमध्ये केलेल्या एका पाहणीत ट्रम्प यांना ४९ टक्के, तर बायडेन यांना ४२ टक्के मते पडली. आता विचारपूर्वक माघार घेऊन ट्रम्प यांचा विजय सहजासहजी होणार नाही, याची काळजी बायडेन यांनी घेतली आहे. २०२० मध्ये राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी बायडेन उभे राहिले, तेव्हा त्यांनी कमला हॅरिस यांची उपाध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी लगेच निवड केली होती. वास्तविक, आपण अध्यक्षपदासाठी पुन्हा उभे राहणार नाही, असे तेव्हाच त्यांनी जाहीर केले होते; परंतु चार वर्षांनंतर पुन्हा एकदा ते रिंगणात उतरलेच. त्यामुळे डेमॉक्रॅटिक पक्षाचेही एकप्रकारे नुकसानच झाले. आता डेमॉक्रॅटिककडून राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवार म्हणून बायडेन यांनी कमला यांना आपला पाठिंबा जाहीर केला असला, तरी कमला यांना पक्षांतर्गत निवडणुकीत आधी इतर उमेदवारांवर मात करावी लागेल. एकदा डेमॉक्रॅटिकतर्फे त्यांच्या उमेदवारीवर शिक्का मारला गेल्यानंतर मगच निवडणुकीची रणनीती निश्चित केली जाईल, असे दिसते. कमला यांची वांशिक मुळे आफ्रिकी व भारतीय आहेत. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी यापूर्वी ओबामा हे कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष झाले आहेत. दोन टर्ममध्ये त्यांनी विलक्षण चमक दाखवली होती. तसेच हिलरी क्लिंटन या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढवणार्या अमेरिकेतील पहिल्या महिला ठरल्या होत्या. अमेरिकेच्या २०० वर्षांपेक्षा जास्त असलेल्या लोकशाहीच्या इतिहासात अमेरिकेने केवळ एकदा कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष निवडला असून, एकदाही या पदावर महिलेची निवड झालेली नाही. ट्रम्प यांना अमेरिकेतील अतिउजव्या, जहाल गटांचा पाठिंबा असून, त्यापैकी बहुसंख्य स्त्री-पुरुष समतेच्या विरोधात तसेच कृष्णवर्णीय व आशियाईंचा द्वेष करणारे आहेत. त्यामुळे कमला यांच्यासमोरील आव्हान फार मोठे आहे. शिवाय ट्रम्प यांनी व्यक्तिगत जीवनात स्त्रियांशी दुर्व्यवहार केला असून, महिलांबद्दल गलिच्छ शेरेबाजीही केलेली आहे. त्यामुळे आता प्रचारात ते कोणती पातळी गाठतील, याचा सहज अंदाज येऊ शकतो. बायडेन यांनी माघार घेतल्यानंतर, कमला यांचा पराभव करणे अधिकच सोपे जाणार असल्याची प्रतिक्रिया ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. कमला यांचा आत्मविश्वास कमी व्हावा, या दृष्टीने ट्रम्प यांनी प्रयत्न चालवले असल्याचे स्पष्ट दिसते; परंतु ट्रम्प ७८ वर्षांचे असून, कमला या त्याच्यापेक्षा १९ वर्षांनी लहान आहेत. उपाध्यक्ष असल्यामुळे त्यांना प्रशासनाचा उत्तम अनुभव आहे. गर्भपाताच्या हक्काविषयी त्यांची भूमिका पुरोगामी असल्यामुळे तरुण मतदारांमध्ये त्या लोकप्रिय आहेत. अमेरिकेतील कृष्णवर्णीय व आशियाईंमध्ये त्यांना चांगले समर्थन लाभेल. तसेच वादविवादात त्या हरणार नाहीत. बायडेन यांच्यापेक्षा कमला यांना राष्ट्राध्यक्ष म्हणून पाहणे आवडेल, असे बहुसंख्य नागरिकांचे मत असल्याचे पाहणी अहवालही सांगतात. २०१६ च्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत हिलरी क्लिंटन पराभूत झाल्या आणि ट्रम्प विजयी ठरले. हिलरी या अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्रीही होत्या आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात तरबेज होत्या. उलट ट्रम्प यांना जागतिक राजकारणाच्या बारकाव्यांची माहिती नव्हती आणि आपल्या संकुचित आर्थिक धोरणांमुळे त्यांनी देशाला अडचणीत आणले. त्यांच्या युद्धखोर धोरणांमुळे अमेरिकेचे चीन, इराण, सीरिया या देशांशी संबंध बिघडले. युरोपीय देशांच्या 'नाटो' संघटनेशीही त्यांनी संघर्ष केला. आता कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर गाविन न्युसम आणि मिशिगनचे गव्हर्नर ग्रेचेन व्हिटमर हेसुद्धा डेमॉक्रॅटिक पक्षाच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारीच्या शर्यतीत आहेत; परंतु कमला यांचा बोलबाला जास्त असून, उमेदवार म्हणून निवड झाल्यास प्रचारासाठी मात्र त्यांच्याकडे केवळ शंभरच दिवस उपलब्ध असतील. भारताने रशियाप्रमाणेच अमेरिकेशीही सौहार्दाचे संबंध ठेवले आहेत.

# मीच माझा काळजीवाहू!

निरोगी जीवनशैलीसाठी- फॉर अ हेल्दी लाइफस्टाईल- स्वत:ची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. आजकाल व्यस्त जीवनात आपण स्वतःची काळजी घेण्यास दुर्लक्ष करतो. आपण प्रत्येक काम खूप मेहनत आणि वेळ देऊन करतो. पण, जेव्हा स्वतःची काळजी घ्यावी लागते तेव्हा आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. यामुळे नंतर अनेक समस्या निर्माण होतात. स्वतः वर प्रेम करा. काळजी घ्या, वेळ काढा आपल्यासाठीच सेल्फ केअर डे का साजरा केला जातो, त्याचा इतिहास आणि महत्त्व काय, जाणून घेऊ याजी... सदर श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा मार्गदर्शक लेख प्रस्तुत... संपादक.

दुर्लक्षामुळे केवळ शारीरिकच नाही तर मानसिक समस्या- मेंटल प्राब्लेम्सनाही सामोरे जावे लागते. त्याचाही वाईट परिणाम आपल्या नात्यावर होतो. अशा स्थितीत स्वत:ची काळजी घेणे आवश्यक आहे. बदलत्या जीवनशैलीत तर, स्वत:ची काळजी घेणे खूप गरजेचे आहे. हे आपल्याला निरोगी आणि आनंदी ठेवते. यासाठी दरवर्षी २४ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय सेल्फ केअर डे साजरा केला जातो. जाणून घेउया, या दिवसाचा उत्सव कधीपासून सुरू झाला आणि या दिवसाचे महत्त्व काय आहे. आज रोजी आंतरराष्ट्रीय सेल्फ केअर डे साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्याचा उद्देश स्वत:ची काळजी घेणे हा आहे. चांगल्या जीवनशैलीसाठी स्वतःची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. आपल्याला शारीरिक, मानसिक आणि भावनिकदृष्ट्या स्वतः ची काळजी घेणे आवश्यक आहे. या कारणास्तव, आंतरराष्ट्रीय सेल्फ केअर फाऊंडेशनने सण २०१४मध्ये हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. ही यूके स्थित एक धर्मादाय संस्था आहे. या फाउंडेशनचा असा विश्वास आहे की, जेव्हा प्रत्येक व्यक्ती प्रथम स्वतःची काळजी घेते तेव्हा निरोगी समाजाची सुरुवात होते. कोविड-१९ महामारीच्या काळात विषाणूपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी, आपल्याला स्वतःची खूप काळजी घ्यावी लागली, यापुढे देखील अशीच काळजी घेणे काळाची गरज आहे.

रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी सकस आहार घ्यावा, व्यायाम करावा आणि स्वतःला निरोगी ठेवावे. त्यामुळे आपला अनेक आजारांपासून बचाव होईल. सोरायसिस आणि मानसिक आरोग्य तज्ञांचा प्रभावी व्यवस्थापनासंदर्भात अत्यंत महत्वाचा सल्ला आहे. माता, भगिणींनो चांगला आहार घ्या आणि अधिक काळ जगा! समृद्ध आहारानं वाढतं स्त्रीयांचं आयुर्मान; संशोधनातली माहिती. मलेरिया झाल्यास पपई खावी; गंभीर आजारासाठी फळे आहेत फायदेशीर! नकारात्मकतेपासून दूर राहावे, निसर्गाच्या जवळ जावे, त्वचेची काळजी घ्यावी, योगासने करावीत, व्यायाम करावे, निरोगी रहावे, चांगली आणि गाढ झोप घ्यावी, जीवनाचा आनंद घ्यावा, आरोग्य तपासणी करावी, पुस्तके वाचावी आणि थोडा वेळ एकांतात घालवावा.

हा दिवस स्वतःवर प्रेम आणि आपल्या शरीराची आणि काळजीच्यापर्यायासाठी योग्य आहे. मागील वर्षाची थीम होती- लवचिकता, अनुकूलता आणि प्रतिकूलतेने भरभराट लोकांमध्ये लवचिकता निर्माण करण्यासाठी तीव्र निषेध, जे व्यक्तींना त्यांचे व्यवस्थापन करण्यास, नकारात्मक भावना, शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्यासाठी मदत करू शकते. प्रत्येक दिवशी स्वत:ची काळजी घेणे निवडले तरी, काही स्वयं-कळजीच्या गोष्टी आपण सुरू करू शकतो. या वर्षापासून केअर डे कसे हे स्पष्ट कराल. येथे हे एक साधे मार्गदर्शन आहे. वेलनेस आणि सौंदर्य जे विकते त्या विरुद्ध, स्वतःची काळजी विस्तृत किंवा फॅन्सी आवश्यक नाही. स्वतःसाठी वेळ शोधावा. हे आपल्या बोलण्यावरून स्वतःसाठी वेळ काढण्याइतके असू शकते. दिवसातून फक्त एक तास का असेना, आमच्या कॅलेंडरमध्ये आम्हाला आनंद देण्यासाठी काही वेळ शेड्यूल करुया. याचा अर्थ असा असू शकतो की आमची वेब सिरीज पाहणे, एखादे पुस्तक वाचणे, हे न करण्यासाठी लांब चालणे. आपण पौष्टिक आहार घ्यावा. जाणकारांनी म्हटल्याप्रमाणे, स्वतःची काळजीही फक्त बबल बाथ आणि फेस मास्कच्या पलिकडे आहे. निरोगीपणाच्या इतकेच आणि प्रभावी हे स्वतःच्या काळजीच्या पैलूंपैकी एक आहे. अधिकतर पालेभाज्या, ताजी फळे आणि संपूर्ण धान्य आम्हाला समतोल आहाराने उर्जा निश्चितच मिळेल, पण आमचे आरोग्यही संपूर्ण असेल. त्याचप्रमाणे आपण आनंद घ्यावा. अन्नापासून वंचित राहणे विसरावे- जसे की आमचा आवडता पदार्थ झाला नाही म्हणून आनंद नसतो. तथापि, अतिरेक करू नका आणि संयमाचा सरावही करू नका. रोज व्यायाम करावा. नियमित व्यायाम तंदुरुस्तीची गती वाढवतो आणि तगण्याची क्षमता निर्माण करण्यात मदत होते, ते डोपामाइन आणि ऑक्सिटोसिन, कारण ल-गुड आरोग्याची मानसिकता कमी करते आणि मानसिक संतुलन बिघडते. सुधारणे देखील मदत करते. आमच्या कुटुंबाशी आणि मित्रांबद्दल संपर्कात राहण्याचा हा एक चांगला मार्ग आहे, विशेषत: जर आपण समूह सहभाग घ्यावा. आपण लक्षात ठेवा- व्यायामासाठी परिपूर्ण फिटनेस दिवस किंवा जिममध्ये जाण्याची आवश्यकता नाही. याचा अर्थ तुमची फक्त दिवसेंदिवस पायरी मोजणे किंवा योगा, पोहणे किंवा नृत्य या व्यायामासाठी शारीरिक व्यायाम गरजेचा ठरतो.

आपल्या सहाय्याने माहिती पुरेशी पाहणे हे चांगले आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आहे, आपण रात्री ७-८ तास झोपेचे लक्ष्य ठेवले पाहिजे. पूर्णपणे स्वच्छतेचा सरावा करून कुटुंबियांना सहभागी करून घेणे, आजारी स्वभावींचा स्वभाव सुधारते. साधा ताप, खोकला, खिळा टोचणे, चट्टा, फोड येणे, याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. पुढे जाऊन मलेरिया, दमा, धनुर्वात, भयंकर त्वचारोग अशा विकारांच्या समस्या उद्भवू शकतात.

बौद्ध धर्मग्रंथ माइंडफुलनेस स्पष्ट करतात. तिची व्याख्या त्याच्या उद्देशाशी संरेखित करते. आम्हाला अधिक स्पष्टपणे पाहण्यासाठी मदत करण्यासाठी, जीवन आपल्यावर काय फेकते त्याला अधिक प्रभावीपणे प्रतिसाद आणि शेवटी अधिक शहाणपणाने निवड करा. हे फोक आणि एकाग्रता सुधारण्यासाठी, व्यवस्थापित करण्यात सकारात्मक आणि भावना वाढवण्यास मदत करते. तुम्ही श्वासोच्छवासाचे व्यायाम, ध्यान, योग किंवा सकारात्मक साधनांच्या मदतीने अंतर्मनाशी संपर्क साधून अंतरिक शक्तीचा उपयोग करू शकता. !! आंतरराष्ट्रीय स्वतःची काळजी दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

*********

– संकलन व सुलेखन –
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# आगामी अर्थसंकल्पात काय असायला हवे?

येत्या मंगळवारी (२३ जुलै) सादर होणाऱ्या नव्या सरकारच्या अर्थसंकल्पाकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. या अर्थसंकल्पाकडून कररचना, रोजगार निर्मिती याबाबतीत कोणत्या अपेक्षा आहेत? सरकारला आपले उत्पन्न वाढवण्यासाठी काय काय करता येऊ शकते? सध्या बोजवारा उडालेल्या सार्वजनिक वाहतुकीबाबत सरकारने अर्थसंकल्पात कसा विचार करायला हवा? मोदींच्या तिसऱ्या पर्वातील पहिला केंद्रीय अर्थसंकल्प २३ जुलैला सादर केला जाईल. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत गरीब, अल्पसंख्याक आणि उत्पन्नातील वाढती विषमता हे घटक निर्णायक ठरल्यामुळे या अर्थसंकल्पात (यापुढे सोयीसाठी 'बजेट') काही महत्त्वाचे बदल अपेक्षित आहेत. एरवी अर्थव्यवस्थेच्या वाढीच्या वेगाकडे लक्ष असते तेव्हा पायाभूत सोयी, जगामधील आर्थिक क्रमवारीत वरचा क्रम पटकावणे, निर्यात वाढवणे आणि शेअरबाजाराच्या घोडदौडीकडे लक्ष पुरवणे, म्युचुअल फंड्समध्ये लोक गुंतवणूक करत आहेत ना हे पाहणे आणि अशा तऱ्हेने अधिक गुंतवणूक होऊन आर्थिक वाढ होणे असा क्रम असतो. नेहमीच्या अर्थतज्ज्ञांनी आणि आर्थिक सल्लागारांनी गुंतवणूक वाढवण्यासाठी नेहमीच्या सूचना केलेल्या आहेत. करपात्र उत्पन्नाची मर्यादा पाच लाखांवरून सात लाखांपर्यंत न्यावी म्हणजे या वर्गातील लोकही गुंतवणुकीकडे वळतील ही अपेक्षा. पण असे म्हणताना आपण सोयीस्कररीत्या हे विसरतो की भारतामध्ये सध्या केवळ आठ टक्के लोक कर भरतात. आणि उत्पन्नावरील करभरणा वाढला तरी संपत्तीमधील वाढत जाणाऱ्या विषमतेला वेसण घालता येत नाही. मागील दोन दशकांमध्ये आपण हे अनुभवले आहे. म्हणूनच निवडणुकीच्या निकालांच्या निमित्ताने आपल्याला संरचनात्मक सुधारणा करण्याची संधी मिळाली आहे. भाजपच्या ध्येयधोरणांशीही ते फार विसंगत नाही. येत्या पाच वर्षांमध्ये.. तरुण, शिक्षित बेरोजगारांच्या संख्येमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवारी योजना आवश्यक आहे. तसेच वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांची संख्या कित्येक पटींनी वाढवण्याची गरज आहे. यासाठी मोठय़ा उद्योगपतींना या प्रकारच्या गुंतवणुकीसाठी करामध्ये सवलत देता येईल. सरकारने जमीन द्यावी आणि खासगी उद्योगांनी त्यासाठी लागणारी यंत्रसामग्री, कर्मचारी व इमारती पुरवाव्यात. या उद्योगांनी आपल्या वैद्यकीय विभागाअंतर्गत महाविद्यालये आणि रुग्णालये उघडावीत. त्यामुळे त्यांना करांमध्ये मोठी सवलत मिळेल. (कंपनीच्या नफ्यातील भागावर) या खासगी महाविद्यालयांमध्ये सरकारी महाविद्यालयांपेक्षा ५० टक्के अधिक फी असावी. मनरेगा, (महात्मा गांधी रोजगार हमी योजना) योजनेचाही विस्तार होण्याची आवश्यकता आहे. शहरातही ही योजना लागू व्हावी. आशा सेविका व मनरेगा कामगार यांचे वेतन वाढवणे आवश्यक आहे. त्यांची गुणवत्ता कशी वाढेल याचाही विचार करावा. तसेच पदवीधर विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी योजनांचे मूल्यांकन करण्याच्या कामी लावता येईल. मनरेगातून निर्माण होणारे प्रकल्प अधिक उत्पादक कसे होतील याचा विचार होणे आवश्यक आहे. शहरी भागातील मनरेगा कामगारांसाठी याशिवाय अनेक कामे काढता येतील आणि शहराचा कारभार अधिक चांगला करता येईल. उदा. पार्किंगच्या सोयी करणे. खरे म्हणजे शहरांमध्ये सुरू असलेल्या वेगवेगळय़ा पायाभूत प्रकल्पांचे त्यांच्या किमतींना अनुसरून विश्लेषण होणे आवश्यक आहे. त्यामध्ये या प्रकल्पाचा लाभार्थी कोण हेही नक्की करणे आवश्यक आहे. कारण गरज नसलेले, जनतेसाठी आवश्यक नसलेले असे अनेक प्रकल्प आखले जात आहेत, मोठे महामार्ग बांधले जात आहेत, असे दिसून येत आहे. सामाजिक शास्त्रांच्या पदवीधरांकडून त्यांचे मूल्यमापन केले जावे. जास्तीत जास्त लोकांच्या आणि श्रीमंतांच्या गरजा यांचे विश्लेषण होऊन योग्य ते प्रकल्प आकाराला येऊ शकतील. यासाठीही शिकाऊ उमेदवार ही योजना कार्यान्वित करता येणे शक्य आहे. अशा विश्लेषणाचा कॅग या सरकारमान्य ऑडिटरपेक्षाही अधिक उपयोग होईल. महसुलाचे स्रोत कोठून येतील? एका बाजूला मोजक्या लोकांच्या हातात संपत्ती आणि उत्पन्नाचे केंद्रीकरण होत आहे. (१४५ कोटी लोकसंख्येपैकी केवळ सात कोटी लोक कर भरतात (२०२०-२१) याचे आपल्याला वैषम्य वाटत नाही.) आपल्या देशातील प्राप्तिकर परतावा भरणाऱ्यांपैकी ५५ टक्के लोकांचे उत्पन्न फक्त २.५ लाख रुपये असते. करपात्रतेसाठी प्रत्येक व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न पाच लाख रुपयांहून जास्त असणे आवश्यक असते. या सात कोटी करदात्यांवर ३५ कोटी लोक अवलंबून असावेत. उरलेले सुमारे १०० कोटी लोक हे अतिगरीब म्हणता येतील. त्यातील काही कोटी करबुडवे निश्चित असतील. त्यांचा थांगपत्ता लावणे आवश्यक आहे. रोजगार बढाओ, गरिबी कम करो..




१. कर भरण्यासाठी मूलभूत करपातळी वाढवू नका. त्यामुळे आयकरपात्र लोकांची संख्या सात कोटींहून कमी होईल. वेगवेगळी डिजिटल तंत्रे वापरून पाच लाखांच्या खाली उत्पन्न असणारे आणि आपले उत्पन्न दडवणारे लोक शोधले तर करदात्यांची संख्या वाढेल.
२. एक कोटी रुपये उत्पन्न असणाऱ्यांसाठी असलेल्या स्लॅबमध्ये काहीही बदल करू नये.
३. ज्यांचे उत्पन्न केवळ शेतीतून येते त्यांना रुपये २० लाखांपर्यंत सवलत द्यावी. त्याहून जास्त उत्पन्न असल्यास नेहमीच्या दराने आयकर लावावा. मात्र ज्यांच्याकडे उत्पन्नाचे इतर स्रोत आहेत आणि शेतीतूनही उत्पन्न असेल त्यांना नेहमीप्रमाणेच आयकर लावावा. कारण पुष्कळदा आयकर टाळण्यासाठी शेतीचे उत्पन्न दाखवले जाते.
खालील उत्पन्न वितरण डेटा (एकूण रु. ६.७५ कोटी करदात्यांकडून सात लाख कोटी जमा होतात. प्रत्यक्ष २०२१-२२ या वर्षांतील मिळालेले आकडे)
४. रु. पाच लाखांहून कमी उत्पन्न असणारे सुमारे ५५ टक्के करदाते आहेत, त्यांना आपण गरीब म्हणतो.
५. निम्न मध्यम वर्ग: रु. पाच लाख ते २० लाख यामध्ये मोडणारे करदाते सुमारे ४० टक्के (प्राप्तिकर भरणारे) आहेत.
६. रु. २० लाख ते ५० लाख या उत्पन्न गटातील मध्यमवर्गातील करदाते २.८ टक्के (प्राप्तिकर भरणारे)
७. रु. ५० लाख ते १ कोटी या उत्पन्न गटामध्ये मोडणारे उच्चमध्यमवर्गीय करदाते फक्त ०.५२ टक्के (तीव्र बदल जाणवतो.)
८. रु. १ कोटी ते ५ कोटी उत्पन्न गटामधील करदाते, १,७९,००० (०.००२ टक्के) श्रीमंत या गटात मोडतात.
९. रु. ५ कोटी ते १०० कोटी उत्पन्न गटामध्ये फक्त ३४००० करदाते आहेत. त्यांना आपण श्रीमंत म्हणू या.
१०. अति अति श्रीमंत गटामध्ये रु. १०० कोटी ते ५०० कोटी, या स्लॅबमध्ये दोन हजार करदाते आहेत.
११. मेगा श्रीमंत रु. ५००० कोटींवर उत्पन्न असणारे ६०० करदाते आहेत.
ही आकडेवारी २०२१-२२ या कालावधीतील आहे. त्यामुळे आता प्रत्येक स्लॅबमधील करदात्यांची संख्या पुढच्या दोन वर्षांत, म्हणजेच २०२४ पर्यंत १५ टक्क्यांनी वाढलेली असणार आहे. त्यामुळेच रु. एक कोटी उत्पन्न असणाऱ्या लोकसंख्येसाठी कोणत्याही प्रकारची सवलत असता कामा नये.सट्टा प्रकारच्या उत्पन्नांसाठी, थोडक्यात शेअर्स, म्युचुअल फंड आणि जमीन जुमला यांच्या उत्पन्नात वेगाने वाढ होत आहे. यावर काही कर वाढवणे आवश्यक आहे.गेल्या सात वर्षांत, म्हणजे २०२१-२२ पर्यंत जो भांडवली नफा झाला आहे, जसे रु. ३.९१ कोटी करदात्यांमध्ये जवळपास दुपटीने रु. ६.७५ कोटी करदाते झाले आहेत. मात्र त्यांच्या नफ्यामध्ये पाच पटीने वाढ झाली. (रु. ६४००० कोटी ते रु. ३,५०,००० कोटी) त्यावर थोडय़ा अधिक दराने आयकर लावणे आवश्यक आहे. उदा. १० % ते १५ % आयकर असणे आवश्यक आहे. २०२४-२५ या वर्षांमध्ये हा भांडवली नफा सर्व मिळून रु .१ लाख कोटींच्या वर जायची शक्यता आहे. त्यावरील कर ५ टक्के करावा. या करांद्वारे सरकारचे उत्पन्न रु. ५००० कोटीने तरी वाढेल.दुसरा स्रोत हा हिंदू अविभक्त कुटुंब या खात्याकडून वसुली करता येणे हा आहे. फक्त हिंदू धर्मीयांना ही सवलत दिली जाते आणि या खात्यावरील उत्पन्नावर वेगळय़ा व कमी दराने प्राप्तिकर भरावा लागलो. आजमितीला १२ लाख हिंदू अविभक्त कुटुंब खाती आहेत. हे उत्पन्न कर्त्यांच्या नावावर जोडले जावे. त्यामुळे सरकारकडे रु. १२०० कोटी अधिक जमा होऊ शकतील. हिंदू धर्मीयांनी अशा प्रकारे जुन्या अवशेषांचा त्याग करण्याची आवश्यकता आहे. तरच इतर धर्मीयांबरोबर समानता आणणे शक्य होईल.रोजगार निर्मितीसाठी कर लावणे आवश्यक आहे. ते केवळ शिकाऊ उमेदवार योजनेसाठी वापरले जातील. (जसे रोजगार हमी योजनेसाठी महाराष्ट्रामध्ये कर लावला जातो.) खालीलप्रमाणे कर लावणे शक्य आहे. रु. १ कोटीपेक्षा जास्त उत्पन्न असेल त्यांच्यासाठी १%. रु.५० कोटी उत्पन्नावर २% आणि रु. ५०० कोटींच्या वर ज्यांचे उत्पन्न आहे त्यांना ३% अशी कर योजना लागू करावी. पहिली दोन वर्षे या करासाठी योग्य प्रतिसाद मिळाला तर तो सुरू ठेवता येईल. हा कर साधारणपणे एक लाख करदात्यांना लागू होईल आणि त्यातून रु. ७० हजार कोटी जमा होऊ शकतील. हे पैसे या विशिष्ट मिशनसाठीच वापरले जातील असा कायदा करणे आवश्यक आहे. यामध्ये कारभारासाठी काही खर्च होणार नाही हे बघितले पाहिजे. तसेच दर तीन महिन्यांनी नवीन नोकऱ्यांची संधी मिळेल असे पाहिले पाहिजे. या नोकऱ्या शक्यतो, कायम स्वरूपाच्या असाव्यात. खासगी उद्योगधंद्यांनाही अशा प्रकाराची शिकाऊ उमेदवारी योजना लागू करण्यासाठी प्रवृत्त करावे. त्यांनाही याचा फायदा होणार आहे. या सर्व कामावर सतत लक्ष ठेवले जावे आणि खऱ्या अर्थाने प्रगती होईल हे पाहण्यासाठी आवश्यक संस्था नेमणे गरजेचे असेल. रोजगार निर्मितीसाठी डॉ. अजित रानडे यांनी सुचवलेला फायनान्शिअल ॲसेट (रु. १०० कोटींहून अधिक असल्यास) एक टक्के वेगळा कर लागू करणे हेही शक्य आहे. यातून सुमारे रु. २५००० कोटी मिळू शकतील.सार्वजनिक वाहतूक सामान्य माणसाच्या जीवनावर परिणाम करणारी आणखी एक कृती आवश्यक आहे, ती म्हणजे बस व मोटर गाडय़ा यावरील पथकर. यामधील भयंकर तफावत दूर करणे आवश्यक आहे. आपण सार्वजनिक वाहतुकीचे महत्त्व सतत नमूद करतो, पण प्रत्यक्षात त्यासाठी आवश्यक बसेसवर बेसुमार कर लावतो. या वास्तवामध्ये मूलगामी बदल केला गेला पाहिजे.

त्यामुळे सरकारी महसूल तर वाढेलच पण मध्यमवर्ग आणि गरीब जनता यांना मोठा लाभ होईल. बसेसची संख्या वाढवणे आणि अत्याधुनिक, वेगवान बसेस खरेदी करणे यामुळे मुंबईसारख्या शहरामधील वाहतूक आणि कोणत्याही दोन जवळच्या गावांमधील वाहतूक सोयीची होईल. त्यामुळे मोटरगाडय़ांची संख्या कमी होऊन वाहतूक समस्या कमी होतील. गाडय़ा आणि बसेस हा प्रत्येक राज्याचा अंतर्गत विषय आहे. बसेसना दरवर्षी पथकर भरावा लागतो, म्हणजेच त्यांच्या संपूर्ण उपयोगाच्या कालावधीमध्ये किमतीच्या रकमेच्या ७० ते ८० टक्के कर त्या भरतात. मोटरगाडय़ांना मात्र खरेदीच्या वेळी एकदाच कर भरावा लागतो. टोकियो, शांघाय आणि लंडन येथे दरवर्षी पथकर भरावा लागतो.

ही परिस्थिती बदलली तरच आपण खऱ्या अर्थाने सार्वजनिक वाहतुकीला महत्त्व देतो हे सिद्ध होईल. बसेसना एकदाच १२ टक्के कर लावावा आणि दहा लाख किमतीच्या आतील सर्व मोटरगाडय़ांना १८ टक्के कर आणि दहा लाखांच्या पुढील किमतीच्या मोटरगाडय़ांना २० टक्के कर लावला पाहिजे. यामुळे आतापेक्षा जास्त रु. ५० हजार कोटी सरकारखाती जमा होतील. अशा धोरणामुळे सगळीच वाहने वेगाने धावतील, वाहतूक कोंडी कमी होईल, तसेच इंधनाची बचत होईल. प्रदूषण कमी होईल आणि सामान्य जनता सुखाने, कमी पैशात प्रवास करेल. हेच तर्कशास्त्र पुढे वापरल्यास आपण साध्या, नेहमीच्या रेलगाडय़ा साधारण १०० ते १४० किलोमीटर वेगाने धावण्याचे ध्येय पुढे ठेवणे आवश्यक आहे. सध्या वंदे भारत रेलगाडय़ा फारशा वेगाने धावत नाहीत. त्यांना डबे कमी असतात आणि त्यांचे भाडे खूप जास्त असते. नेहमीच्या गाडय़ांमध्ये सर्व वर्गातील सीट्स असतात, शिवाय त्यांना भरपूर डबे असतात. त्यांचा वेग वाढवला तर त्यांची आताची भाडी २० % दराने वाढवता येतील. सामान्य लोकही एव्हढी भाडी द्यायला तयार असतील आणि त्यांचा प्रवास सोयीचा व सुखाचा होईल. येत्या पाच ते १० वर्षांसाठी आपण हे धोरण स्वीकारले पाहिजे. त्यामुळे मोटरगाडीने प्रवास करण्याची लोकांना गरज वाटणार नाही आणि प्रदूषण कमी होऊन हवेची गुणवत्ता सुधारू शकेल.

आर्थिक तुटीचे धोरण चुकीचे आहे, असे म्हटले जाते. पण अशा धोरणांमुळे ज्या सुधारणा होतील त्यांचे मूल्यमापन करून रिझव्र्ह बँकेने दरवर्षी सरकारला मोठी रक्कम बक्षीस द्यावी. मोदी सरकार हे वास्तववादी आहे म्हणून मला असे वाटते की वरील सूचना त्यांना मान्य व्हाव्यात.

# घरफोडीच्या गुन्ह्यातील दोन अट्टल गुन्हेगारांना मुद्देमालासह अटक.

## दरोडा, जबरीचोरी, घरफोडीचे १७ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :– घरफोडीच्या गुन्ह्यातील दोन अट्टल गुन्हेगारांना, २०६ ग्राम सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे १५ लाख २३ हजर रुपयाच्या मुद्देमालासह अटक. दरोडा, जबरीचोरी, घरफोडीचे १७ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

याबाबत थोडक्यात माहिती की, लातूर जिल्ह्यातील वेग–वेगळ्या पोलीस ठाणे हद्दी मध्ये रात्रीच्यावेळी राहते घराचा कडी–कोंडा तोडून घरफोडीच्या घटना घडल्या होत्या. तसेच दरोडा व जबरी चोरीचे ही गुन्हे घडले होते. त्यावरून जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला घरफोडी, दरोडा, जबरीचोरी करणाऱ्या अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते.

सदरचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आदेशित केले होते. त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या होत्या.

सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना मोठ्या प्रमाणात बातमीदार नेमून तसेच तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेण्यात येत होते.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी केलेल्या परिश्रमामुळे पथकांना गुप्त बातमीदाराकडून घरफोडीचे गुन्हे करणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली.



घरफोडीतील गुन्हेगार त्याने चोरलेला सोन्याचा मुद्देमाल विकण्यासाठी अहमदपूर ते टेंबुर्णी जाणारे रोडवर एका ब्रिजच्या खाली त्यांनी चोरलेले सोन्याचे दागिने विकण्या साठी येणार आहेत. अशी माहिती मिळाली. सदर माहितीची खातरजमा करून सदरचे पथक तात्काळ अहमदपूर येथे रवाना करण्यात आले सदर पथकाने अहमदपूर तालुक्यात पोहोचून अहमदपूर ते टेंबुर्णी जाणाऱ्या परिसरात सापळा लावून दोन संशयित आरोपीला ताब्यात घेतले.

सदर पथकांनी अतिशय कुशलतेने सापळा लावून दरोडा, जबरी चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यातील संशयित आरोपीला दिनांक २२/०७/२०२४ रोजी ताब्यात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव भारत गोविंद शिंदे उर्फ अशोक समिंदर शिंदे, वय ४५ वर्ष, राहणार बोरी तालुका जिंतूर जिल्हा परभणी, सध्या राहणार मळाई पार्क, फुरसुंगी, हडपसर जिल्हा पुणे. अविनाश किशन भोसले, वय २३ वर्ष, नायगाववाडी तालुका नायगाव जिल्हा नांदेड असे असल्याचे सांगितले.

त्याच्याकडे असलेल्या पिशवीची झडती घेतली असता त्यामध्ये सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने दिसून आले त्याबाबत त्याच्याकडे विचारले तेव्हा त्याने त्याच्या इतर साथीदारासह मिळून लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये घरफोडी, दरोडा, जबरीचोरी चे गुन्हे केल्याचे व त्या गुन्ह्या मध्ये चोरलेला, त्याच्या हिश्याला आलेले सोन्या–चांदीच्या दागिन्याचा मुद्देमाल व रोख रक्कम असल्याचे कबूल केले. लातूर जिल्ह्यात घडलेल्या घोरफोडीच्या गुन्ह्याच्या अभिलेखाची पाहणी केली असता नमूद आरोपीनी पोलीस ठाणे अहमदपूर येथील चार गुन्हे , पोलीस ठाणे वाढवना येथील चार गुन्हे ,चाकूर पोलीस ठाण्यातील पाच गुन्हे,पोलीस ठाणे किनगाव, उदगीर ग्रामीण, लातूर ग्रामीण व रेणापूर येथील प्रत्येकी एक गुन्हा असे एकूण १७ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून नमूद आरोपीस त्याने चोरलेल्या २०६ ग्राम सोन्याचे दागिने, ९९ ग्रॅम चांदीचे दागिने व रोख रक्कम ३५,०००/– हजार रुपये रोख असा १५ लाख २३ हजार १९२ रुपयाच्या मुद्देमालासह पुढील कारवाई करिता पोलीस ठाणे वाढवना यांचे ताब्यात देण्यात आले आहे. असून त्याच्या सोबत असलेल्या फरार आरोपी साथीदाराचा शोध सुरू आहे.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने अतिशय उत्कृष्टरित्या तपास करून बंद घराचे कुलूप तोडून घरफोडी तसेच दरोडा व जबरीचोरी सारखे गंभीर गुन्हे करून करून सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळून त्यांच्याकडून चोरलेला मुद्देमाल हस्तगत केला आहे.सदरचे गुन्हेगार हे सराईत असून ते लातूर सह इतर शेजारील जिल्ह्यांना सुद्धा त्यांच्याकडील गुन्ह्यात पाहिजे आहेत. इतर जिल्ह्याचे पोलीस त्यांच्या मागावर होते परंतु नमूद गुन्हेगार त्यांचे राहण्याचे ठिकाण सतत बदलत असल्याने पोलिसांना मिळून येत नव्हते. वरिष्ठांच्या मार्गदर्शनात अतिशय कुशलतेने व माहितीचे संकलन करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमूद आरोपींना ताब्यात घेतले आहे. नमूद आरोपी कडून आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, पोलीस अमलदार माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, मोहन सुरवसे, राजेश कंचे, राजाभाऊ मस्के, तुराब पठाण, प्रदीप स्वामी, जमीर शेख, संतोष खांडेकर नकुल पाटील, अंगुली मुद्रा शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमितकुमार पुणेकर, पोलीस अमलदार धनंजय गुट्टे, फोटोग्राफर सुहास जाधव, सायबर सेलचे पोलीस अमलदार संतोष देवडे, गणेश साठे, शैलेश सुडे यांनी केली आहे.

---

## भांडुप महिला मंडळाच्या वतीने वर्षावासा निमित्याने अन्नधान्य जीवना आवश्यक वस्तूचे धम्मदान.



भांडुप / प्रतिनिधी : – आषाढी पौर्णिमा सोहळा (वर्षावास प्रारंभ) प्रथम धम्म प्रवर्तन दिवस २१ जुलै २०२४ रोजी भांडुप महिला मंडळाच्या वतीने राजगृह बुद्ध विहार सुभाष नगर नाहूर येथे राहत असणाऱ्या पूज्य भन्ते बोधीशील महास्थवीर त्यांचा भिख्खू संघ भन्ते यशपाल,भन्ते हर्षबोधी यांना अन्नधान्य जीवना आवश्यक वस्तु वर्षावासा निमित्ताने धम्मदान केले. धम्म उपासिका वर्षा लोखंडे,कोकिळा बांगर,चंद्रकला तायडे,ज्योती थाटे, तुळजाबाई इंगळे,सुनिता तायडे,विजया वानखडे यांनी भन्तेना अन्नधान्य जीवना आवश्यक वस्तु वर्षावासा निमित्ताने दान केले. धम्म उपसीका महिला मंडळ दरवर्षी आषाढी पौर्णिमा वर्षावासा निमित्याने अन्नधान्य जीवना आवश्यक वस्तूचे धम्मदान करीत असतात.

## मानवाला धम्म उपदेश करून कुशल मार्गावरती आरुढ केले - धम्मभूषण राम कांबळे

मुरूम / प्रतिनिधी :– भगवान बुद्धांनी समस्त मानवाला अविद्येच्या अज्ञान अंधकारातून मुक्त करणारे आणि प्रज्ञेच्या प्रकाशामध्ये आणणारे ज्ञान पेरले. याच दिवसापासून बुद्ध धम्मातील पवित्र तीन महिन्यांच्या वर्षावासाला सुरवात होते. या काळात उपोसथ विधी ' अशुद्ध मनाची शुद्धता ' करण्याचा हा काळ आहे. बौद्ध धम्मामध्ये गुरुपौर्णिमा अर्थात आषाढ पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. कारण या दिवशी तथागतांच्या जीवनातील अनेक घटना याच दिवशी घडल्या आहेत. मानवाला धम्म उपदेश करून कुशल मार्गावरती आरुढ केले, असे प्रतिपादन त्रिरत्न बौद्ध महासंघाचे धम्मचारी धम्मभूषण राम कांबळे यांनी केले. कांबळे परिवाराच्या वतीने सिद्धार्थ कॉलनी येथे आयोजित वर्षावास, गुरुपौर्णिमा, धम्मचक्क प्रवर्तन दिन आषाढ पौर्णिमा निमित्ताने गाथापठन व धम्मदेसना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून रविवारी (ता. २१) रोजी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी अधिक्षक मिलिंद कांबळे होते. यावेळी शिवाजी गायकवाड, अमर कांबळे, सरकार भिमराज ग्रुपचे अध्यक्ष आनंद कांबळे, अभिजीत कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. धम्मभूषण म्हणाले की, राजा शुद्धोधन राणी महामाया यांच्या राज्यांमध्ये प्रत्येक पौर्णिमेला अतिशय सुंदर असा महोत्सव साजरा केला जात असे. आषाढी पौर्णिमेच्या दिवशी असाच उत्सव साजरा करून महामाया आपल्या महालामध्ये आराम करत असताना त्यांच्या स्वप्नामध्ये सुमेध नावाचा बोधिसत्व हत्ती येऊन हे माते या पृथ्वीतलावरील माझा शेवटचा जन्म आहे आणि तो जन्म मला तुझ्या पोटी जन्म घ्यावा वाटते. अशा प्रकारची विनंती करतो महामायाला जाग आल्यानंतर या स्वप्नांचा उलगडा करण्यासाठी महाराजांना सांगते. याच दिवशी महामायांना गर्भधारणा होते. ती घटना याच आषाढ पौर्णिमा दिवशी होऊन सुंदर असा राजकुमार जन्माला आला. सिद्धार्थ गौतम रोहिणी नदीच्या पाण्याच्या प्रश्नावरून आपल्याच नात्यांमध्ये युद्ध करणे, संघर्ष करणे हे न पटल्यामुळे त्यांनी अशा ह्या परंपरेविरुद्ध आणि मनुष्याच्या दुःखाचा शोध घेणे कामी सर्व सुखाचा, सुख वैभवाचा त्याग करून दुःख निवारणाच्या शोधासाठी घराबाहेर पडले म्हणजेच महाभिनिष्क्रमण म्हणून संबोधले जाते. याच उदात्त विचाराने प्रेरित होऊन सिद्धार्थ गौतमाने गृहत्याग केला. तो याच आषाढ पौर्णिमा दिवशी. सिद्धार्थ गौतमाने सहा वर्ष अनेक प्रकारच्या खडतर तपश्चर्या करून बुद्धत्वाची प्राप्ती केली. चार आर्य सत्याचा शोध मानवाच्या कल्याणासाठी दुःखमुक्त करण्याकरिता पहिला धम्म उपदेश पंचवर्गीय भिक्षू कौडिण्य, महानाम, वप्प, अश्वजीत व भद्दीय यांना सांगून पहिले धम्मचक्र प्रवर्तन संपन्न केले. तो याच आषाढ पौर्णिमा दिवशी. प्रारंभी दिपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. अमर कांबळे, गौरव कांबळे, ज्योती मुरुमकर, सुजाता कांबळे आदींनी पुढाकार घेतला. यावेळी सुप्रिया कांबळे, रसवंती कांबळे, अनुराधा गायकवाड, ईच्छा गायकवाड, किर्ती कांबळे,



कमल कांबळे, अभिजीत गायकवाड आदींसह बहुसंख्येने धम्म बंधू–भगिनी उपस्थित होत्या. प्रास्ताविक सुनिता कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन अजिंक्य मुरुमकर तर आभार अमर कांबळे यांनी मानले.

फोटो ओळ : सिद्धार्थ कॉलनी, मुरूम, ता. उमरगा येथे कांबळे परिवाराच्या वतीने आयोजित वर्षावास निमित्ताने गाथापठन व धम्मदेसना प्रसंगी राम कांबळे व अन्य.

---

# जगामध्ये दुःख मुक्तीचा मार्ग महामानव तथागत भगवान बुद्धांनी सांगितला....!

**प्राचार्य डॉ. संजय गवई यांचे प्रतिपादन. पूर्णा :– बुद्ध विहार पूर्णा या ठिकाणी आषाढ पौर्णिमेनिमित्त वर्षावास अधिष्ठान व धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन**

लातूर–बोधिसत्व डॉ. बी. आर. आंबेडकर स्मारक व बुद्ध विहार समिती, पूर्णा आणि भारतीय बौद्ध महासभा, पूर्णा जि. परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढ पौर्णिमा वर्षावास अधिष्ठान आणि धम्म देसना कार्यक्रम पूर्णा येथील बुद्ध विहारात आयोजित करण्यात आला होता यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष भदंत डॉ. उपयुक्त महाथेरो हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून भंते पय्यावंश, भंते संघरत्न, डॉ. राजपाल चिखलीकर, बापूराव गजभारे आणि बाबुराव पाईकराव यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. सकाळी साडेपाच वाजता बुद्ध विहारांमध्ये त्री–रत्न वंदना पूजा पाठ, परित्राण पाठ व सूत्र पठण घेण्यात आले.

पुढे बोलताना महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. संजय गवई महामानव तथागत भगवान बुद्ध यांच्या मानव मुक्तीच्या विचारावर भाष्य करताना सांगितले की, तथागत भगवान बुद्ध यांनी जगामध्ये प्रथमच २६०० वर्षांपूर्वी दुःखमुक्तीचा मार्ग सांगितला. मानवी दुःखाचे कारण आणि त्या दुःखामधून मुक्ती मिळण्यासाठी उपाय सुद्धा त्यांनी सुचविले. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी त्यामुळेच बुद्ध धम्म स्वीकारला आपल्या अनुयायांना दिला. या महामानवाच्या शिकवणीमुळेच एका खेड्यातील संजय महाविद्यालयाचा प्राचार्य होऊ शकला. देशातील तरुणाईने वाचन संस्कृतीकडे व बुद्ध विहाराकडे वळले पाहिजे. विहारामधून धम्माचे संस्कार होतात आणि संस्कारातून आदर्श माणूस बनत असतो. या कामी महिला भगिनींनी आपल्या पाल्यांना उच्चशिक्षित करून धम्माचे संस्कार दिले पाहिजे. आपल्या मुला मुलींना विहारात पाठवले पाहिजे असेही ते म्हणाले.



सुप्रसिद्ध लेखक विचारवंत डॉ. सत्यजित चिखलीकर यांनी महाविद्यालयीन जीवनामध्ये मिलिंद कॉलेजमध्ये शिकत असताना होस्टेलवर तथागत बुद्धांचा सुविचार आळस मृत्यू समान आहे हा सुविचार वाचण्यात आल्यानंतर अभ्यास करताना कधी कंटाळा केला नाही आणि त्यामुळेच मी इंग्रजीचा प्राध्यापक लेखक होऊ शकलो असे ते म्हणाले.

यावेळीनांदेडयेथीलपीपल्सरिपब्लिकनपार्टीचेमहाराष्ट्रसचिवमाजीमहानगरसेवकबापूराव गजभारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली आणि या सभेच्या माध्यमातून अस्पृश्य समाजाला शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मूलमंत्र दिला. या घटनेला शंभर वर्षे पूर्ण होत आहे याची आठवण करून दिली. आपल्या मुला–मुलींना उच्च आणि दर्जेदार शिक्षण देऊन महामानव तथागत भगवान बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मुला–मुलीवर बिंबवले पाहिजे असे सांगून नांदेड येथे गोदावरी नदीमध्ये अतिशय भव्य–दिव्य भगवान बुद्धांची मूर्ती बसवण्याचा त्यांचा संकल्प पूर्णत्वास जात आहे. भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो हे माझे श्रद्धास्थान आहे. त्यांच्या मार्गदर्शनातूनच मी समाजसेवा व धम्म सेवा समर्पित भावनेने करत आहे. अखिल भारतीय भिख्खू संघाचे कार्याध्यक्ष डॉ. उपगुप्त महस्थविर यांनी आषाढ पौर्णिमेचे महत्त्व, वर्षावासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करून महामानव तथागत भगवान बुद्धांच्या काळापासून अध्ययन आणि अध्यापनाची जी प्रक्रिया आहे त्याचं अनुकरण आपण केलं पाहिजे असे त्यांनी आपल्या धम्मदेशनेमध्ये सांगितले. डॉ.बी.आर.आंबेडकर व बुद्ध विहार समितीच्या वतीने सर्व प्रमुख पाहुण्यांचे शाल पुष्पहार सन्मान चिन्ह बुद्ध विहार स्मरणिका देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास नगरसेवक ॲड. हर्षवर्धन गायकवाड, नगरसेवक मुकुंद भोळे, उद्योजक गौतम भोळे, सामाजिक कार्यकर्ते दिलीप गायकवाड, साहेबराव सोनवणे, इंजिनियर पी.जी. रणवीर, ज्येष्ठ धम्म उपासक अमृत मोरे, टी. झेड. कांबळे, बाबाराव वाघमारे, पंडित डोंगरे शिवाजी थोरात, शाहीर गौतम कांबळे, गंगाधर कांबळे आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किशोर ढकरगे, अतुल गवळी, इंजिनीयर विजय खंडागळे, राजू जोंधळे, बुद्ध विहार समिती भारतीय बौद्ध महासभा धम्म सेवेत कार्यरत असलेल्या महिला मंडळांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारतीय बौद्ध महासभेचे माजी तालुकाध्यक्ष श्रीकांत हिवाळे यांनी

---

## सर्वसामान्यांना दिलासा;विकसित भारत संकल्पनेला बळ पंतप्रधानांनी कोट्यवधी देशवासियांचा विश्वास ठरविला सार्थ

### नवरत्न अर्थसंकल्पात युवा भारताचे प्रतिबिंब मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रतिक्रीया

मुंबई :– कररचनेत मोठे बदल करून सर्वसामान्यांना दिलासा देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोट्यवधी देशवासियांचा विश्वास सार्थ ठरविला. केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला हा अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवा, कौशल्य विकास, रोजगार, पायाभूत सुविधांची उभारणी, शहरांचा विकास अशा विविध नऊ घटकांवर लक्ष केंद्रीत करणारा नवरत्न अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करतानाच युवकांच्या कल्याणासाठी भरीव तरतूद, रोजगाराला चालना देणारा आणि विकसीत भारत संकल्पनेला बळ देणारा असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले. शेतकऱ्यांना बळ केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग सातव्यांदा आज केंद्रीय अर्थसंकल्प मांडला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करीत मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, गरीब, महिला, युवा, शेतकरी या घटकांवर भर देतानाच कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटींची तरतूद तसेच शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरविण्याचा निर्णय हा कृषी क्षेत्राबरोबरच शेतकऱ्यांना बळ देणारा आहे. त्याचबरोबर एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन देण्याचा निर्णय हा काळाची गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## आंबेडकरवादी प्रसिद्ध कवी नवनाथ रणखांबे यांचा आयकॉन ऑफ नेशन या राष्ट्रीय पुरस्काराने गौरव

पुणे / प्रतिनिधी :– जम्मू राजघराण्याच्या वंशजा राणी डॉ. सुहासिनी सुदन आणि पद्मश्री पुरस्कार विजेता डॉ. विजयकुमार शहा , यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय विविध बुक ऑफ रेकॉर्ड धारक आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय विविध पुरस्काराने सन्मानित, आंबेडकरवादी सुप्रसिद्ध कवी जीवनसंघर्षकार फेम नवनाथ आनंदा रणखांबे यांना आयकॉन ऑफ नेशन या मानाच्या राष्ट्रीय पुरस्काराने रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्डच्या वतीने पुणे –पिपरी येथील आचार्य आत्रे रंगमंच येथे नुकतेच सन्मानित करण्यात आले. देशातील विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उमटविणाऱ्या प्रतिभाशाली प्रतिभावंत मान्यवरांचा सतरावे अखिल भारतीय प्रतिभा प्रेरणा महासंमेलना च्या पार्श्वभूमीवर आयकॉन ऑफ नेशन या राष्ट्रीय पुरस्काराने रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्डच्या वतीने राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

WORLD 7 WONDER'S RADIANT TALENT BOOK OF RECORD



यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. कौशिक गायकवाड, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे लेखक आणि वर्ल्ड सेव्हन वंडर्स पब्लिकेशन रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्सचे संस्थापक – मुख्य संपादक , जगप्रसिद्ध निसर्गोपचारतज्ज्ञ डॉ. क्रांती महाजन , राजमाता जिजाऊ यांच्या घराण्याचे वंशज शिवाजी राजे जाधव , तंजावर घराण्याचे वंशज विजयसिंह राजे भोसले , भारत सरकारच्या ऋ–२० चे डायरेक्टर तथा रूडकी आयआयटी चे रजिस्ट्रार संजीव जैन्थ , भारत सरकारच्या एनवायकेएस चे मेघालय मणिपूर नागालँड चे संचालक अतुल निकम , गोवा व महाराष्ट्र राज्याचे संचालक यशवंत मानखेडकर , कॅनडाचे निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. गुरतेज सिंग ब्रार , सीआयडी ऑफिसर आरिफा मुल्ला , समाजसेवक यशवंत कुर्वे , चीफ एडज्यूकेटर ज्युरी डॉ. एस. देवेंद्र , स्वागताध्यक्ष संतोष बारणे, आदी मान्यवर उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची कामगार चळवळ गोव्यात



भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची कामगार चळवळ हे ऐतिहासिक पुस्तक गोव्यातील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते आणि बौद्ध धम्म चळवळीचे प्रचारक आयु.एस के जाधव यांना स्नेहपूर्वक भेट देतांना सागर तायडे,सोबत जगजीवनराम बौद्ध मुंबई,मिलिंद बनसोडे वास्को दी गामा,आयु.किशोर जाधव गोवा,किशोर जाधव यांना सागर तायडे लिखित क्रांतिकारी विचारांच्या सागर लाटा,आरक्षणाच्या लभार्थींनी शासन कर्ती जमात बनावे ही पुस्तके स्नेहपूर्वक भेट देण्यात आले. विशेष म्हणजे किशोर जाधव यांच्यामुळेच गोवा राज्यातील अनेक ठिकाणी सदिच्छा भेट देऊन, कार्यकरत्याशी चर्चा करण्यात आली.

# गुत्तेदाराची की टक्केवारी वसुलीची काळजी ?

## नियो.मातोश्री रमाबाई गृह संस्थेमधील पक्या नव्या गटारी व रोड पावसाळ्यात का फोडले ?





लातूर :- येथील नियोजित मातोश्री रमाबाई गृह संस्थेमधील पूर्व अस्तित्वात असलेल्या नव्या गटारी व पक्के रोड, अचानकपणे ऐन चालू भर पावसात जेसीबी यंत्राने का फोडण्यात आले ? आणि या बाबत कोणाकडे तसे लेखी आदेश वा जबाबदारी नसतानाही, अशी खाजगी गुत्तेदाराच्या बिलाची की टक्केवारीच्या वसुलीची अखेर कोणाची काळजी होती ? मात्र अशा परस्पर मनमानीमुळे, या ठिकाणच्या स्थानिक गरीब रहिवाश्यासह, अन्य नागरिकांच्या नित्य वाहतुकीची भयंकर गैरसोय झाली असल्याने, मनपातील सदर विभागाच्या या दहशती गंभीर प्रकाराविरुध्द, पीडितांनी मा.जिल्हाधिकारी व मा. आयुक्ताकडे लेखी तक्रार निवेदन सादर केले आहे.

मनपाच्या या तुघलकी कारोभारा विषयी निवेदनातील थोडक्यात माहिती अशी की, नांदेडरोड वरील स्वामी विवेकानंद चौकालगत, ग.न.९५ मध्ये सुमारे ४० वर्षापूर्वी वसलेली मागासवर्गीय कष्टक-यांची, नि. मातोश्री रमाबाई गृह संस्था आहे. २० वर्षा नंतर सन २०१२ साली मा. उच्च न्यायालयाने सदर संस्थेस निर्णय दिला. दरम्यान त्या-त्या तत्कालीन मा. जिल्हाधिका-यांनी, येथील रहिवासी पात्र व गरजू सदस्यांना योग्य ती पहाणी करून, येथे शासकीय घरकुले, शौचालय, लाईट, पक्केरोड-गटारी आदी सर्व रितसर सुविधा पण दिल्या. अर्थात मनपामध्ये या सर्वांच्या भोगवटाधारक म्हणून कायदेशीर नोंदीही झाल्या. या सोसायटीच्या उत्तर बाजूने विवेकानंद चौक ते सिध्देश्वर चौक असा, एक ३३ फुटी पारंपारिक गाडी-शिवरस्ता आहे. या जुन्या रोडला पुढे आडव्या कृपासदन मार्गाचा पहिला चौक आहे. या जुन्या रोडवर विवेकानंद चौक ते कृपा सदन रोडपर्यंत दक्षिणेकडून या सोसायटीची तर उत्तर बाजुने नाथनगरची अशी काही घरे आहेत.

स्वामी विवेकानंद चौकापासून या सोसायटी च्या बाजूने विद्युत पोलसह, नवी पूर्व पक्की गटार व डांबरी रोड तयार आहे. पण पुढे कृपासदन रोड जवळ नाथनगरमधील शिक्षक असलेल्या ४ कुंटूबियांनी व या सोसायटीतील एका कुंटुबाने, याच सरकारी रोडमध्ये बेकायदा अतिक्रमण केले. त्यामुळे या विवेकानंद चौक ते सिध्देश्वर चौक या रोडवर सदर ठिकाणी दोन्ही बाजूनी पक्या गटारी व रोड काही झाला नाही. पुढे कांही काळाने मा.जिल्हाधिकारी यांनी सरकारी नकाशा प्रमाणे, स्वतः पाहणी करून व उभे राहून, ते सर्व अतिक्रमणे जमीनदोस्त केली. आणि कार्याकाला प्रमाणे ते मा.जिल्हाधिकारी हे नंतर बदलून गेले. त्यानंतर लागलीच त्या ५ ही लोकांनी सदर रोडवर, पुन्हा आपले तसेच बेकायदा अतिक्रम पूर्ववत उभे केले. तर संबंधित मनपा प्रशासनाने त्याकडे अर्थपूर्ण असे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले. म्हणून त्याच ठिकाणी तेवढ्या पक्या गटारी व रोड कांही आजपर्यंत ही झाले नाहीत. म्हणून मनपा प्रशासनाने ते गैर अतिक्रम कठोरपणे अंतिमतः हटवणे बंधनकारक होते. आणि त्या ठिकाणच्या प्रलंबित अधु-या असलेल्या गटारी व रोड पूर्ण करणे गरजेचे आहे. कारण तेवढ्याच ठिकाणी कच्चा रोड असल्याने व गटारी नसल्याने पाणी, चिखल, दल दल व घाण झाल्याने, वाहन चालक व पादचा-यांना अडचण तर स्थानिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

मात्र सदर अतिक्रमित ठिकाणी मनपा प्रशासनाने कांहीही न करता ते अगदी तसेच सोडून दिले. आणि कांही आवश्यता, गरज किंवा मागणीही नसताना ऐन चालू कोसळत्या पावसामध्ये, शनिवार १३ जुलै २०२४ रोजी दुपार नंतर, फक्त त्यांच्या एक खाजगी गुत्तेरासह, त्यांचेच एक जेसीबी यंत्र पाठवून दिले. आणि या नि.सोसायटी लगतचा सुमारे १५० फुटांचा पूर्व पक्का डांबरी रोड खोदून उध्वस्त करावयास लावला. आणि रविवार १४ जुलै या दुस-या दिवशी दुपारी १२ ते २.३० च्या दरम्यान, परत त्याच लोक व जेसीबीने सदर सोसायटीतील एका घरा समोरची, नवी व पक्की असलेली पूर्व सिमेंट गटार अंदाजे १० फुटांच्या लांबीत, कोळसत्या पावसात हेतुतः जेसीबीने चक्क फोडून काढली. त्याने गटार व पडत्या पावसाचे पाणी घर- वस्तीत जाण्याचा आणि सदर भिंतीना धक्का पोहचण्याचा मोठा धोका ओढावला. बहुतांष कष्टकरी बाहेर कामावर गेलेले. पावसाची चळकधार सुरुच. तशातही त्या सोसायटीतील कांही रहिवासी नागरिक धाऊन पुढे गेले. आणि आपण हे असे काय करत आहात ? मागणी व आवश्यकता नसताना, तुम्ही असे पक्के रोड व गटारी पावसाळ्यात का फोडताय ? तुमच्या सोबत कागद वा कर्मचारी पण नाही. येथे पुढे जेथे रोड व गटारी नाहीत. त्या ठिकाणी तरी काम करा. या पक्या व नव्या गटारी व आमच्या घरांच्या भिंती अशा जेसीबीने पाडून, तुम्ही या सर्व वस्तीत पाणी सोडणार आहात, असा उपस्थितांनी त्यांना जाब विचारला.

त्यावर जेसीबीवाले व गुत्तेदार यांना उलट म्हणाले की, मनपातील एका साहेबांनी या रोडवरील ते पुढचे अतिक्रमण व कच्चे प्रलंबित अर्धे रोड व गटारी तशाच राहू द्या. त्यांचे बरोबर आहे असे म्हणून, तुमच्या सोसायटीतील हे नवे गटार व पूर्व पक्की डांबरी सडक, अगदी याच घरापासून साहेबांनी आम्हास जेसीबीने उखडून टाकावयास सांगीतली आहे. एवढ्यातच आम्हास गट्टू टाकावयाचे आहेत. मोठ्या साहेबांचा आम्हास हांडगा फंड आलाय. आणि तुम्ही कोणी यात आडवे आलात तर, तुमच्यावरच पोलिस केस करावयास आम्हाला सांगीतले आहे. तरीही संभाव्य अडचण व नुकसान लक्षात घेऊन, उपस्थितांनी त्यांना प्रत्यक्ष विरोध केला. त्यावेळी ते उद्या तुमचे पाहुण घेतोत असे म्हणून परत निघून गेले. ते काही अद्याप वापस आले नाहीत. परंतु त्यांनी पावसाळ्यात गटारी व रोड फोडल्याने, घरं व भिंतीचे नुकसान होत आहेच. शिवाय त्यांनी पक्का रोड उखडल्याने, सर्व प्रकारच्या दैनंदिन वाहतुकीस भयंकर त्रास होत आहे. हा अन्याय असून मनपाचा सदर विभाग हा, केवळ आम्ही गरीब व मागास म्हणून, गेली कांही वर्षापासून, असा मुद्दामपणे अमानवी छळ करत आहे. म्हणून सदर बाधित परिवारांने मा. जिल्हाधिकारी व मा.पोलिस अधीक्षक आदींना, दि.१६/७/२०२४ रोजी सविस्तर लेखी तकार सादर केली आहे. या प्रकाराची तातडीने वरिष्ठाकडून सखोल चौकशी करावी. सहभागी सर्व दोषिविरुध्द कायदेशीर योग्य ती कठोर कार्यवाही करावी. आणि उखडलेला तो पक्का डांबरी रोड व ती नवी पक्की गटार, येत्या ८ दिवसात मनपाने पूर्ववत दुरुस्त करून द्यावी, अशा मागण्या केल्या आहेत. अन्यतः १५ ऑगस्ट पासून या वस्तीमधील सर्व पीडित कुटुंबं हे, मा.जिल्हाधिकारी साहेब लातूर यांच्या कार्यालयासमोर, सनदशीर मार्गाने बेमुदत सामूहिक अन्नत्याग सत्याग्रह करतील, असा इशाराही दिला आहे.

# समाधानकारक पावसाने शेतकरी सुखावला; किनवट तालुक्यात आजपर्यंत ४१५ मि. मी. पावसाची झाली नोंद

**रिमझिम पाऊस, जनजीवन विस्कळीत**

१ :२०जुलै रोजी सकाळ संततधार सुरू असल्याने जनजीवन विस्कळीत झाले. तर शेती कामाला अडथळा आला. कापूस पिकाला खत टाकणे, कीटकनाशक औषधी फवारणी, अंतरमशागत, खुरपणी अदी कामे दिवसभर बंद होती. तर रिमझिम पावसाने गावातील अंतर्गत रस्ते चिखलमय बनले तर सखल भागात पाणी साचले आहे. ठिकठिकाणी सखल भागात पाणी साचल्याने पादचारी व वाहनधारकांना रस्त्यातून मार्ग काढताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.



किनवट/शेख शौकत :-गेल्या पंधरा वर्षांच्या काळात यावर्षी समाधानकारक पाऊस व पावसाचे दिवस असल्याने खरीप हंगामातील पिके समाधानकारक आहेत. त्यामुळे बळीराजा सुखावला आहे. पाऊस जसा पिकाला पोषक तसा गवत वाढण्यालाही पोषक असल्याने तणनाशके फवारणीची लगबग सुरू झाली असल्याचे तालुक्यातील चित्र आहे. खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये कापूस पिकाच्या लागवडीत वाढ झाली असून सोयाबीनचे क्षेत्र घटले आहे. ज्वारी, मूग, उडीद या पिकाकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली असल्याचे दिसून येत आहे. किनवट तालुक्यात आजपर्यंत ४१५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यावर्षी पावसाचे दिवस जास्त पासून अधूनमधून पाऊस पडतच आहे. यावर्षी खरीप हंगामात पीक लागवडीसाठी सर्वसाधारण क्षेत्र ७८ हजार १ हेक्टर असताना ७९ हजार ७७ हेक्टर क्षेत्रात पेरणी झालेली आहे. सोयाबीनचे घसरणारे भाव पाहता शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाची पेरणी यावर्षी कमी प्रमाणात केली आहे. सर्वसाधारण क्षेत्र १८२०३ हेक्टर असताना १६४०५ हेक्टर क्षेत्रात प्रत्येक्षात पेरणी झाली आहे. कापूस या नगदी पिकाकडे किनवट तालुक्यातील शेतकरी वळले असल्याचे दिसून येत आहे. कारण कापूस पेरणीसाठी सर्वसाधारण क्षेत्र ४८०७२ हेक्टर असताना प्रत्येक्षात ५१७७४ हेक्टर क्षेत्रात लागवड झाली आहे. ३७०२ हेक्टर क्षेत्रात यावर्षी कापूस पिकाची लागवड जास्त झाली आहे. तर १८१८ हेक्टर सोयाबीन पिकाची पेरणी कमी झाली आहे. ज्वारी पिकाचे प्रचंड क्षेत्र घटले आहे. मूग, उडीद या अंतर पिकाकडे तर शेतकऱ्यांनी जणू पाठच फिरवली आहे. जवळपास सर्वच खरीप हंगामातील पिकांची परिस्थिती खूप चांगली आहे. सतत अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे जमिनीतील ओलावा टिकून राहतो आणि पिकांसाठी हा पाऊस उपयुक्त ठरत आहे.

योग्यवेळी तण नियंत्रण ठेवण्यासाठी तणनाशके फवारण्याची गरज आहे. तणनाशके फवारताना शेतकऱ्यांनी गढूळ पाणी वापरू नये, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी बालाजी मुंडे, मंडल अधिकारी उत्तम निखते,यांनी केले आहे. आजपर्यंत झालेला मंडळ निहाय पाऊस या प्रमाणे किनवट (४५७), बोधडी (२८५), इस्लापूर (३८१), जलधरा (५७२), शिवणी (३६५), मांडवी (४३८), दहेली (३७४), सिंदगी (४५६), उमरी (३९८) असा सरासरी ४१५ मिमी, इतका पाऊस झाला आहे. पाऊस जास्त झाला असला तरी मोठा पाऊस पडला नाही. भूगर्भातील पाणी पातळी वाढण्याला मदत झाली नाही. अशीच परिस्थिती राहिली तर - भविष्यात पाणी टंचाईचे भीषण समस्या निर्माण होण्याची भीती आहे. आजपर्यंत पावसाळ्यात १६ जुलै रोजी - एक दिवस झालेल्या पावसाने पैनगंगा नदी असो किंवा किनवट तालुक्यातील छोटे मोठे नाले असोत ते वाहिले आणि जनावरांना नवीन पाणी प्यायला मिळाले.

# श्रावस्ती बुद्ध विहारात पु.भिक्खु धम्मबोधीचे अधिष्ठान सुरु .



लातूर :- लातुर शहरातील श्रावस्ती बुद्ध विहार ट्रस्ट संचलीत श्रावस्ती बुद्ध विहाराचा १६वा वर्षावास धम्मग्रंथ वाचन आणि पुज्य भिक्खु धम्मबोधी यांचे अधिष्ठान आरंभ झाले.यावेळी श्रावस्ती महिलामंडळाच्या अध्यक्षा कुसुम बानाटे यांच्या अध्यक्षते खाली वर्षावास आरंभ झाला.सकाळी ठिक:१०:००वाजता ज्योती घारगावकरच्या नेतृत्वात बुद्धभिमाला धुप,दीप,पुष्पाने वंदन करत बुद्ध वंदना घेतली. आणि सायंकाळी ठिक५:००पुज्य भिक्खु धम्मबोधी पानगाव यांच्या अधिष्ठानाला आरंभ होण्यापुर्वी भंतेजींना पुष्पवृष्टीने बुद्ध विहारात आणले.नंतर प्रतिभा सावळे यांनी याचना घेतली.भंतेजींनी भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म हा ग्रंथ,बुद्ध निर्मीती आणि आषाढ पौर्णिमा वर्षावासारंभ तथा गुरु पौर्णिमेचे महत्व सांगत शीलसदाचारी माणुसच होणे मंगल आहे.यातच सर्वांचे कल्याण आहे.असे धम्मदेसनेतुन सांगीतले. धम्मग्रंथाचे वाचन प्रतिभा सावळेंनी केले. धम्मपालन गाथेनी सांगता केली.यावेळी कांताबाई कांबळे,कविता भालेराव,महादेवी वाघमारे,पुष्पा शिंदे,रमा भुई,शीला शेवाळे,सुनिता मस्के या दानदात्यांचा पुष्पहार देवुन स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचलन विलास घारगावकरनी केले, यावेळी खीरदान सुकुमार गोरेंनी केले.तर पुष्पा शिंदेंनी केळी वाटप केली.मोठ्या संख्येने लहानथोर ऊपासक,ऊपासिका उपस्थित होते.



# साहित्यिक उत्तम तरकसे आदर्श समाजसेवक पुरस्काराने सन्मानित




पुणे / प्रतिनिधी :- पुणेमहानगरपालिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात राजयुवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य व राजयुवा प्रकाशन पुणे यांच्या वतीने शब्द पंढरीचे आम्ही वारकरी राज्यस्तरीय कवी संमेलन आयोजित कार्यक्रमात राज्य शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित जेष्ठ कवी - साहित्यिक श्री उत्तम दासु तरकसे (असरडोहकर) यांना प्रमुख पाहुणे सौ ललिता सबनीस व श्री रवींद्र बाराटे यांच्या हास्ते आदर्श समाजसेवक पुरस्कार २०२४ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्री उत्तम दा. तरकसे यांनी कृतज्ञता म्हणून आपल्या मनोगतात मोलाचे विचार मांडत राज युवा प्रतिष्ठान व राज प्रकाशन पुणे या कार्यकारणी सभासदांचे व अध्यक्ष गौरव पुंडे व उपाध्यक्ष योगेश हारणे यांनी मला आदर्श समाजसेवक पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल मनापासून आभार मानले.

सदर कार्यक्रमाच्या विचार मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून श्री लक्ष्मण शिंदे (साहित्यिक), सौ.ललिता सबनीस (साहित्यिका), श्री शैलेंद्र भांगे (साहित्यिक), सौ सुलभा लोंढे (साहित्यिका), श्री रविंद्र बाराटे (सिने निर्माते अभिनेते ), श्री संजय वेदपाठक (अभिनेते ), असे नामांकित विचारवंत साहित्य मंचावर उपस्थित राहून सर्व उपस्थित कवी व प्रेक्षक श्रोत्यांना मोलाचे मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धेश उतेकर यांनी उत्कृष्टपणे सादर केले रसिक व कवीनी महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून हजेरी लावून सभागृह अगदी फुलून गेला होता कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे उपाध्यक्ष श्री योगेश हरणे यांनी उपस्थित प्रमुख अतिथींचे व निमंत्रित कवी व रसिक प्रेक्षक यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# गोव्यात प्रथम आषाड पूर्णिमा निमित्य भन्ते कुशल धम्म सुंतरो यांचा धम्म देशना सोहळा संपन्न.




गोवा :- आषाढी पौर्णिमा सोहळा (वर्षावास प्रारंभ) प्रथम धम्म प्रवर्तन दिवस २१ जुलै २०२४ रोजी कॉन्फरन्स हॉल आझाद भवन पर्वरी गोवा येथे संबोधी ट्रस्ट गोवा यांच्या वतीने आदरणीय भन्ते कुशल धम्म सुंतरो,यांची धम्म देशना झाली.अध्यक्ष डॉ.उल्हास चांदोरकर यांच्या अध्यक्षते खाली ही धम्म देशन संपन्न झाली. धम्मउपासक,उपासिका आणि गोव्यातील सामाजिक,धार्मिक संस्था संघटना पदाधिकारी सहभागी झाल्या होत्या. त्यात धम्म उपासक धम्म उपासिका रानी केरकर,वासंती अडवेल पालकर,अनंत कौशल,छाया कोरगांवकर,तुकाराम तोरसकर,प्रकाश जाधव, निखिल प्राजकते,सतीश कोरगावकर,किशोर जाधव, गुरुदास विनोडकार,एस.के.जाधव,राजू जाधव. संबोधी ट्रस्ट गोवा यांच्या या धम्मदेशना सोहळ्यात विशेष प्रतिनिधी म्हणून सागर तायडे व जगजीवनराम बौद्ध उपस्थित होते.

संबोधी ट्रस्ट गोवा यांच्या आषाढी पौर्णिमा सोहळा (वर्षावास प्रारंभ) प्रथम धम्म प्रवर्तन दिवस सोहळ्यात भारतीय बौद्ध महासभा गोवा राज्य शाखा,बौद्ध संघर्ष समिति,गोवा राज्य विभाग,सावित्रीबाई फुले महिला मंडळ गोवा,सिंधुदुर्ग बौद्ध हितवर्धक मंडळ गोवा विभाग,महामाया महिला मंडळ उसगांव,विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर जनसेवा समिति पेडणे,बुद्धिस्ट इंटर नॅशनल नेटवर्क गोवा युनिट. सम्राट अशोक कला क्रिडा आणि सांस्कृतिक मंडळ उसगांवयांचे पदाधिकारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.विशेष धम्मउपासक,उपासिका आणि गोव्यातील सामाजिक,धार्मिक संस्था संघटना सहभागी झाल्या होत्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE